ओबीसी उपसमितीच्या बैठकीवर भुजबळांसह ३ मंत्र्यांचा बहिष्कार

मुंबई (प्रतिनिधी)– मनोज जरांगे-पाटील यांच्या आंदोलनाने राज्यात पुन्हा मराठा विरुद्ध ओबीसी असा संघर्ष निर्माण होण्याची चिन्हे असताना मंगळवारी इतर मागासवर्गाच्या (ओबीसी) संदर्भात गठीत करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत ओबीसी नेत्यांमधील मतभेद समोर आले. ओबीसी समाजाच्या कल्याणकारी योजनांसाठी निधी मिळत नसल्याची तक्रार करत मंत्री छगन भुजबळ, गुलाबराव पाटील आणि संजय राठोड यांनी आजच्या बैठकीतून सभात्याग केला.ज्येष्ठ मंत्र्यांच्या बहिष्काराच्या भूमिकेने महायुतीतील बेबनाव उघड झाले आहेत.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीमध्ये गणेश नाईक, पंकजा मुंडे, अतुल सावे आणि दत्तात्रय भरणे यांच्यासह भुजबळ, पाटील, राठोड यांचा समावेश आहे. परंतु, सरकारकडून ओबीसी महामंडळाला पुरेसा आणि योग्य प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला जात नसल्याचा आरोप मंत्र्यांनी बैठकीत केला. महामंडळाच्या विविध योजना निधीअभावी रखडल्याने आणि प्रशासकीय उदासीनतेमुळे ओबीसी समाजात असंतोष पसरत असल्याचे सांगत या मंत्र्यांनी थेट बैठकीतून बाहेर पडण्याचे पसंत केले.

दरम्यान, ओबीसींसाठी अर्थसंकल्पातील मंजूर निधी वित्त विभागाने ओबीसी विभागाला तातडीने द्यावा, अशी तंबी चंद्रशेखर बावनकुळे यांनी बैठकीत दिली. हा निधी द्यावा असे कायदेशीर बंधन असतानाही अधिकाऱ्यांकडून वेळकाढूपणा केला जात असल्याबद्दल बावनकुळे यांनी नाराजी व्यक्त केली. राज्यातील ओबीसी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहांना जागा उपलब्ध करून देणे, प्रलंबित शिष्यवृत्तीची रक्कम अदा करणे आणि ३६ ओबीसी जातींचा केंद्राच्या यादीत समावेश करणे अशा सुमारे १३ ते १४ महत्त्वाच्या मुद्द्यांवर ओबीसी मंत्रीमंडळ उपसमितीच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. ओबीसी महामंडळांच्या निधीचा प्रश्न येत्या डिसेंबरपर्यंत मार्गी लावण्याचा आणि काही विषय राज्य नियोजन समितीकडे पाठविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय बैठकीत झाला.

आठ हजार कोटी घेता..मग संकटात हात का सोडून देताय?

साखर कारखान्यांच्या समस्यांवर बाळासाहेब थोरातांचा रोखठोक सवाल

पुणे (प्रतिनिधी)– केंद्र आणि राज्य सरकार साखर कारखानदारीतून दरवर्षी सुमारे आठ हजार कोटी रुपयांचा प्रचंड महसूल गोळा करते, मग हीच कारखानदारी संकटात असताना सरकार तिचा हात का सोडून देत आहे? असा रोखठोक सवाल राज्याचे माजी कृषिमंत्री व काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी उपस्थित केला.

पुण्यात जय वैभवलक्ष्मी फाउंडेशनच्या वतीने आयोजित सहकार पुरस्कार सोहळ्यात माजी मंत्री दिलीप देशमुख यांना केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते सहकार भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यावेळी थोरात बोलत होते. यावेळी लातूरचे खासदार शिवाजी कोळगे, माजी आमदार संजय जगताप, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, वैभवलक्ष्मी फाऊंडेशनचे अध्यक्ष उल्हास पवार, जय वैभवलक्ष्मी ग्रुपचे संस्थापक प्रा. डॉ. व्ही. एस. अंकलकोंडे पाटील आदी उपस्थित होते. मानपत्र, तुळशीची माळ, संत तुकाराम महाराजांची मूर्ती आणि उपरणे असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

सध्याच्या कठीण काळात महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्राला आणि विशेषतः संकटात सापडलेल्या साखर कारखानदारीला केंद्र सरकारकडून भक्कम आर्थिक मदत आणि पाठबळ मिळणे अत्यंत आवश्यक असून, ही सरकारची नैतिक जबाबदारी आहे, असे ते म्हणाले.

बाळासाहेब थोरात यांनी साखर कारखानदारीला सतावत असलेल्या विविध आर्थिक आणि धोरणात्मक अडचणींचा पाढाच केंद्रीय सहकार राज्यमंत्र्यांसमोर वाचला. थोरात म्हणाले की, सध्या आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत बाजारपेठेतील साखरेचे अनिश्चित दर, इथेनॉल निर्मितीपुढील बिकट समस्या आणि उत्पादनासाठी लागणारा भरमसाठ खर्च यामुळे कारखाने चालवणे कठीण झाले आहे. साखर उत्पादनासाठी कारखान्यांना करावा लागणारा प्रत्यक्ष खर्च आणि त्यांना साखरेला मिळणारा प्रत्यक्ष भाव यामध्ये प्रचंड तफावत निर्माण झाली आहे. या विसंगतीमुळे आज महाराष्ट्रातील प्रत्येक साखर कारखान्याला प्रति क्विंटल सुमारे २०० रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे, ज्याने कारखान्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे ढासळले आहे.

इथेनॉल संदर्भात तात्काळ धोरणात्मक स्पष्टता आणावी

या संकटात भर घालणाऱ्या इथेनॉल धोरणावर बोलताना त्यांनी तीव्र चिंता व्यक्त केली. सरकारच्या आग्रहाखातर आणि त्यांच्या धोरणांवर विश्वास ठेवून राज्यातील साखर कारखान्यांनी कोट्यवधी रुपयांची मोठी गुंतवणूक केली आणि आपले लक्ष इथेनॉल निर्मितीकडे वळवले. मात्र, केंद्र सरकारच्या धरसोड वृत्तीच्या आणि धोरणातील अनिश्चिततेमुळे आज कोट्यवधी रुपयांचा इथेनॉल साठा कारखान्यांमध्ये पडून आहे. इथेनॉल वाहून नेणारे ट्रक कारखान्यांच्या बाहेर तब्बल १०-१० दिवस उभे राहत असून अखेरीस ते न घेताच माघारी पाठवले जात आहेत, अशी व्यथा मांडत थोरातांनी इथेनॉल संदर्भात तात्काळ धोरणात्मक स्पष्टता आणण्याची आग्रही मागणी केली.

साखर कारखानदारीला नवसंजीवनी देण्यासाठी थोरातांनी केंद्र सरकारला काही व्यावहारिक मार्गही सुचवले. केंद्राने साखर कारखान्यांना थेट रोख स्वरूपात निधी देण्याऐवजी त्यांच्या कर्जाच्या हप्त्यांवर किंवा व्याजात विशेष सवलती द्याव्यात, अथवा थेट अनुदान देऊन मदत करावी, अशी मागणी त्यांनी केली. सहकार क्षेत्रातून मिळणारा आणि फिरणारा प्रत्येक पैसा अखेर गरीब शेतकऱ्यांच्याच खिशात जात असल्यामुळे, हा लढा केवळ कारखान्यांचा नसून थेट बळीराजाला न्याय देण्याचा आणि त्याला संकटातून वाचवण्याचा आहे, असे थोरात यांनी नमूद केले. केंद्रीय सहकार राज्यमंत्री म्हणून मुरलीधर मोहोळ यांनी महाराष्ट्रातील या अतिशय महत्त्वाच्या आणि शेतकऱ्यांशी जोडलेल्या गंभीर विषयाकडे तात्काळ लक्ष द्यावे, अशी विनंती थोरातांनी केली. मोहोळ यांनी केंद्रीय पातळीवर या सर्व समस्यांचा प्रभावी पाठपुरावा करून महाराष्ट्रातील साखर कारखानदारीला या मोठ्या संकटातून बाहेर काढण्यासाठी तात्काळ दिलासादायक निर्णय मिळवून द्यावेत, असे साकडे बाळासाहेब थोरातांनी मोहोळ यांना घातले.

साखर कारखान्यांना १० हजार कोटींची करमाफी

साखर उद्योगाचा वर्षानुवर्षे रखडलेला प्राप्तीकराचा प्रश्न केंद्र सरकारने कायमस्वरूपी मार्गी लागला असून साखर कारखान्यांना १० हजार कोटी रुपयांची करमाफी मिळाली आहे असे मुरलीधर मोहोळ यांनी यावेळी सांगितले.

राष्ट्रीय सहकार विकास महामंडळाच्या माध्यमातून राज्यातील साखर उद्योगाला ११ हजार कोटी रुपयांचा भरीव निधी उपलब्ध करून दिला असून पक्षीय राजकारण बाजूला ठेऊन सहकार आणि शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी केंद्र सरकार कटिबद्ध असल्याचे मोहोळ यांनी सांगितले.

काँग्रेसचे दिवंगत नेते आणि माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख हे देवेंद्र फडणवीस यांच्या इतकेच आपले आवडते मुख्यमंत्री होते असे मोहोळ यांनी यावेळी नमूद केले.

दिलीप देशमुख म्हणाले, लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेने गेल्या ४० वर्षांत कसल्याही प्रकारची आर्थिक मदत घेतली नाही. सरकारच्या मदतीवर अवलंबून न राहता आपण स्वावलंबी व्हायचे, आपल्या सर्व संस्था नफ्यातच आणायच्या. शिस्त आणली, चांगले अधिकारी निवडले, पैशाचा नीट उपयोग केला तर हे सर्व शक्य आहे.

हर्षवर्धन पाटील यांनी विलासराव देशमुख यांच्या आठवणींना उजाळा दिला. प्रा. डॉ. व्ही. एस. अंकलकोंडे पाटील यांनी प्रास्ताविकात संस्थांचा प्रवास उलगडला.

पुणे-नाशिक रेल्वेसाठी लढा निर्णायक टप्प्यात- आ. सत्यजीत तांबे

■ तांत्रिक बाबींसह जनभावनाही तपासण्याची मागणी

संगमनेर (प्रतिनिधी) – पुणे-नाशिक रेल्वेसाठी गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेला संघर्ष आता अंतिम टप्प्यात आला असून, मार्ग बदलण्याच्या चर्चेला सुरुवात झाल्यापासून गेल्या दोन वर्षांत माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली आपण मोठ्या प्रमाणावर लढा उभारला आहे. त्याचा परिणाम म्हणून केंद्र व राज्य सरकारने या प्रश्नाच्या तांत्रिक बाबी तपासण्यासाठी तज्ज्ञ समिती स्थापन केली असून, समितीने ६० दिवसांत निर्णय द्यावा, अशी आपली ठाम मागणी असल्याचे आमदार सत्यजीत तांबे यांनी सांगितले.

माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना आमदार तांबे म्हणाले की, फेब्रुवारीतील अर्थसंकल्पीय अधिवेशनात आपण पुणे-नाशिक रेल्वेचा प्रश्न सभागृहात उपस्थित केला होता. त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डॉ. अनिल

काकोडकर यांच्या नेतृत्वाखाली तज्ज्ञ समिती स्थापन करून नारायणगाव परिसरातील जीएमआरटीच्या प्रकल्पाचा रेल्वेमार्गावर नेमका किती परिणाम होतो, यासह तांत्रिक बाबी तपासल्या जातील, असे आश्वासन दिले होते. मात्र, त्यानंतर चार-पाच महिने समिती स्थापन न झाल्याने ९ ऑगस्ट रोजी क्रांती दिनाच्या निमित्ताने आंदोलनाची घोषणा करण्यात आली. त्यानंतर ६ ऑगस्ट रोजीच राज्य शासनाने काकोडकर समिती स्थापन करण्याचा शासन निर्णय काढला. या समितीत डॉ. काकोडकर यांच्यासह रेल्वे बोर्डाचे अधिकारी तसेच पुणे व नाशिक विभागाचे आयुक्तांचा समावेश आहे.

क्रांती दिनाच्या आंदोलनात समितीला ६० दिवसांचीच मुदत द्यावी आणि त्यापेक्षा मुदतवाढ देऊ नये, तसेच केवळ तांत्रिक बाबींचा विचार न करता स्थानिक नागरिकांच्या भावना जाणून घेण्यासाठी जनसुनावणी घ्यावी, अशा दोन प्रमुख मागण्या करण्यात आल्या होत्या. या दोन्ही मागण्या सरकारने मान्य करून त्याबाबत लेखी आश्वासन दिल्याचे तांबे यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, केंद्र सरकारकडून पुणे-नाशिक रेल्वे रद्द झाल्याचे यापूर्वी जाहीर करण्यात आले होते. त्यानंतर शिर्डी-अहिल्यानगर मार्गे रेल्वे नेण्यासंदर्भातील गॅझेट प्रसिद्ध झाल्याने पुणे-नाशिक रेल्वेचा मार्ग बदलल्याच्या बातम्या समोर आल्या. मात्र, काकोडकर समिती आता स्थापन झाली असून, तिच्या अहवालाची आपण प्रतीक्षा करीत आहोत.

पूर्वीचा मार्ग कायम राहावा, ही आपली प्रमुख मागणी आहे. मात्र, नाशिक-शिर्डी तसेच अहिल्यानगर-पुणे हे रेल्वेमार्ग करण्यास आपला विरोध नाही. हे मार्ग अधिक थेट झाल्यास प्रवाशांचा वेळ वाचणार आहे. परंतु, हे नवीन मार्ग करताना अनेक वर्षांपासूनची पुणे-नाशिक रेल्वेची मागणी बाजूला सारण्याचा प्रयत्न सरकारने करू नये, अशी आमची माफक अपेक्षा आहे, काकोडकर समिती स्थापन होण्यापूर्वीच्या निर्णयाच्या आधारे आलेल्या बातम्यांमुळे संभ्रम निर्माण झाला आहे. आता समिती स्थापन झाली असून तिला ६० दिवसांची मुदत देण्यात आली आहे. त्यामुळे सरकारवर विश्वास ठेवून समितीच्या निर्णयाची प्रतीक्षा करू आणि पुणे-नाशिक रेल्वेसाठीचा संघर्ष पुढेही सुरू ठेवू, असेही आमदार तांबे यांनी स्पष्ट केले.

समितीने नेमके केले काय?

▶ काकोडकर समिती स्थापन होऊन जवळपास २५ दिवस झाले आहेत. समितीला ६० दिवसांची मुदत दिली असताना त्यातील २५ दिवस संपले; मात्र अद्याप कोणत्याही हालचाली दिसत नाहीत. आम्ही डॉ. अनिल काकोडकर यांच्याशी संपर्क साधला असता, 'शासनाने अद्याप मला कळवलेच नाही,' असे त्यांनी सांगितले. एवढी दिरंगाई होत असेल, तर ही बाब जनतेसमोर आली पाहिजे.

-सत्यजीत तांबे, आमदार

कुकडी प्रकल्पासाठी ५७०४ कोटींची तरतूद

पुणे, अहिल्यानगरसह सोलापूर जिल्ह्याला सिंचनाचा लाभ

मुंबई (प्रतिनिधी)– पुणे जिल्ह्यातील कुकडी पाटबंधारे प्रकल्पाच्या कामासाठी चौथी सुधारित प्रशासकीय मंजुरी देतानाच या प्रकल्पासाठी ५ हजार ७०४ कोटी ५० लाख रुपयांच्या तरतुदीस मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या निर्णयामुळे पुणे, अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्ह्यातील टंचाईग्रस्त भागातील सिंचन सुविधांना बळकटी मिळणार आहे.

कुकडी पाटबंधारे प्रकल्प येडगाव, माणिकडोह, वडज, डिंभे आणि पिंपळगाव जोगे या पाच धरणांचा संयुक्त प्रकल्प आहे. या पाच धरणांची एकूण उपयुक्त पाणीसाठा क्षमता ३०.५२ टीएमसी असून प्रकल्पाचा पाणीवापर ३९.३६ टीएमसी इतका आहे. प्रकल्पामुळे पुणे जिल्ह्यातील आंबेगाव, जुन्नर आणि शिरूर, अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर, श्रीगोंदा आणि कर्जत तसेच सोलापूर जिल्ह्यातील करमाळा या सात टंचाईग्रस्त तालुक्यांतील एकूण १ लाख ४४ हजार ९१२ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळणार आहे. दरसूचीतील वाढ, जादा दराच्या निविदांची स्वीकृती, भूसंपादनाच्या खर्चातील वाढ, विशेषतः नवीन भूसंपादन कायद्यामुळे झालेली वाढ, संकल्पचित्रातील बदल, नवीन अथवा वगळलेल्या तरतुदी, अपुऱ्या तरतुदी तसेच अन्य अनुषंगिक खर्चामुळे प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाली आहे. त्यानुसार राज्यस्तरीय तांत्रिक समितीने प्रस्तावाची छाननी केल्यानंतर महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने हा चौथ्या सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव सादर केला होता.

जिल्हा बँकेसाठी संगमनेर तालुक्यातून सर्वाधिक १२३ हरकती

अखेरच्या दिवशी २०४ तर एकूण हरकतींची संख्या २३८ वर पोहचली

अहिल्यानगर (प्रतिनिधी)– जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रारूप मतदार यादीवर हरकती दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. हरकती दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी २०४ हरकती आणि सुचना तर एकूण एकूण २३८ हरकती प्राप्त झाल्या आहेत. यामध्ये सर्वाधिक १२३ हरकती एकट्या संगमनेर तालुक्यातून दाखल झाल्या आहेत.

जिल्हा बँकेच्या प्रारूप मतदार यादीवर हरकती आणि सुनावणी होवून अंतिम मतदार यादी १५ सप्टेंबरला प्रसिद्ध होणार आहे. त्यानंतर बँकेच्या २१ संचालकांच्या निवडणुकीचा कार्यक्रम अंदाज १५ ते २० दिवसांनी जाहीर होईल. दरम्यान, यंदा निवडणुकीसाठी बँकेचे ३ हजार ६७७ मतदार आहेत. त्यात ३६६ संस्थेचे ठराव अपात्र ठरले असून २३३ संस्थांनी ठराव सादर केले नाहीत. ३१ ऑगस्ट ते १० सप्टेंबरपर्यंत हरकतींवर सुनावणी होणार आहे. त्यानंतर १५ सप्टेंबरला अंतिम मतदार यादी जाहीर होणार आहे.

तालुकानिहाय दाखल हरकतीमध्ये नेवासा १४, अकोले १४, पारनेर १०, जामखेड ७, कर्जत १ ० , श्रीगोंदा १२, नगर तालुका १२, राहुरी ३, श्रीरामपूर ५, राहाता ९, पाथर्डी ६, शेवगाव ४ कोपरगाव ९, संगमनेर १२३ अशा एकूण एकूण २३८ दाखल आहेत. जिल्हा बँकेच्या एकूण हरकतींपैकी निम्म्याहून अधिक हरकती संगमनेर तालुक्यातून आल्याने राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे. आता निवडणूक प्राधिकरणाकडून या सर्व हरकतींची छाननी व सुनावणी करून अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे.

पुन्हा ठराव घेण्याचे खंडपीठाचे आदेश

पाथर्डी तालुक्यातील एका सेवा संस्थेच्या ठरावाचे प्रकरण थेट छत्रपती संभाजीनगर खंडपिठात पोहचले. न्यायालयात या प्रकरणावर चर्चा होवून दरम्यान याचिकाकर्त्याच्यावतीने पुन्हा ठराव घेण्याचे आदेश देण्यात आले आहे. जिल्हा बँकेच्या निवडणुकीत खंडपिठात जाणारे पाथर्डी तालुक्यातील हे प्रकरण बहुदा पहिले प्रकरण ठरणार आहे.

बनावट राजीनाम्यामुळे मुठेवाडगाव सोसायटीत खळबळ

चेअरमन द्वारका मुठेंचा विरोधकांवर आरोप

माळवाडगाव (वार्ताहर)– श्रीरामपूर तालुक्यातील मुठेवाडगाव सोसायटीत माझ्या नावाने ६ आगष्ट२ ०२६ रोजी बनावट सहीचा राजीनामा अर्ज विरोधकांनी सचिवांकडे सुपूर्द केला. या अर्जाचा बनाव उघड होऊन सोमवार दि.३१ ऑगष्टच्या मासिक सभेत आपणास या बनावट अर्जाचे चर्चेस सामोरे जावे लागेल म्हणून बहिष्कार टाकला असल्याचे पत्रक सोसायटीच्या विद्यमान चेअरमन द्वारका मुठे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

या पत्रकात सोसायटीच्या मासिक सभेस बहिष्कार टाकला असा आरोप करणाऱ्या विरोधकांचा समाचार घेताना विद्यमान चेअरमन व्दारका बाळकृष्ण मुठे यांनी पुढे म्हटले की, मुरकुटे गटाचे फुटीर नेते शिवाजी मुठे व दुसरे फुटीर गटाचे बबन मुठे यांनी ६ ऑगष्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजता सोसायटीत जावून चेअरमन द्वारका मुठे यांच्या नावाचा राजीनामा सचिवांकडे सुपूर्द केला. तेथे लगेच बबन मुठे यांनी संस्थेचे सचिवांवर दबाव आणून मिटींगचे अजेंठा काढायला लावला. ही प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत पर्यंत २ वाजले होते. ही बातमी शिवाजी मुठे यांच्या निकटवर्तीय एका कार्यकर्त्याने डॉ. शंकरराव मुठे यांना भ्रमणध्वनीवरून सांगितली. दुपारनंतर ३ वाजता डॉ.मुठे यांनी सर्व चक्रे फिरवली. ४ वाजता सोसायटीचे संचालक डॉ.शंकर मुठे, भागवत मुठे, सभाजी गोसावी, ज्ञानेश्वर मुठे, कल्पना मुठे, भिकचंद मुठे यांना बरोबर घेवून चेअरमन द्वारका मुठे यांनी सोसायटीचे सचिव दत्तात्रय जासुद यांना लेखी अर्ज दिला. या अर्जात म्हटले आहे की, मी सोसायटीच्या चेअरमन पदाचा राजीनामा कोणाकडे दिलेला नाही. त्या वेळी सचिवांनी शिवाजी मुठे व बबन मुठे यांनी तुमचा राजीनामा अर्ज दिल्याचे सांगितले. त्या वेळी मी पाच पंचा समवेत लेखी अर्ज दिला. कि मी कोणाकडे माझ्या चेरअमनपदाचा राजीनामा अर्ज दिलेला नाही. सचिवाने दाखवलेला राजीनामा अर्ज खोटा आहे व त्यावरची सही माझी नाही. त्यामुळे राजीनाना मंजूर करण्यासाठी काढलेले अजंठे रद्द करायला लावले. यामुळे विरोधकांचे सर्व मनसुबे धुळीस मिळाले. विरोधकांची अवस्था जिल्हा बँकेचा ठराव शिवाजी मुठे गटाचा झाला. पण त्याबदल्यात सागर मुठे यांची शेतकरी संघटना व बबन मुठे फुटीर गटाला भास्कर बाबुराव मुठे यांना चेअरमन करायचे दिलेला शब्द कसा पूर्ण करायचा असा मोठा प्रश्न उभा राहिला. त्यामुळे ते सभेला आले नाही. पुढील मिटींग ३ तारखेला गुरुवारी होत आहे.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व डॉ. सुजय विखे यांनी गावाच्या विकासासाठी भरपूर निधी आणण्याचे काम आमच्या गावातील नेते डॉ. शंकरराव मुठे यांनी केले. रस्ते, लाईट, घरकुल, घरकुल साठी साडे सात एकर जमिन, सभामंडप, पाटपाणी,बचत गटासाठी साहित्य,हायमॅस्ट लाईट, बंधारे, दलित वस्ती निधी, ज्येष्ठ नागरिकसाठी साहित्य, आयोध्या दर्शन, असे अनेक कामे डॉ. मुठे यांनी केल्यामुळे आगामी ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांना एकटे पाडण्याचे काम विरोधक करून बदनामी करत असल्याचे पत्रकात शेवटी चेअरमन सौ. मुठे यांनी म्हटले आहे.

कॉकरोच पक्षाचा मोर्चा मागे

नवी दिल्ली– २० ते २५ जुलै दरम्यान कॉकरोच जनता पक्षाच्या आंदोलकांवर नोंदवलेल्या सर्व एफआयआर रद्द करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी दिले. गुन्हेगारी रेकॉर्ड असलेल्या आंदोलकांना या सवलतीचा लाभ मिळणार नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. हा आदेश देशातील सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये नोंदवलेल्या प्रकरणांना लागू असेल. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर सीजेपीने ५ सप्टेंबर रोजी दिल्लीतील प्रस्तावित निषेध मोर्चा मागे घेतला.

पान १ वरुन

सुटे तेल विक्रीला १ वर्षाची सूट!

यानंतर मुदतवाढ मिळणार नाही, कायदा पाळावाच लागेल. या एका वर्षात प्रत्येकाने आपल्या व्यवसायात अनुकूल बदल करावा, अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीसांनी खाद्यतेल विक्री करणाऱ्या व्यवसायिकांना दिल्या आहेत.

समिती गठण करणार – मुख्यमंत्री

खाद्यतेल विक्री करण्यासाठी कायद्याचे पालन करताना पारंपरिक व्यावसायिकांना काय बदल करावे लागतील, यासाठी समिती गठित करणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. त्यासाठी, एफडीए आणि व्यापाऱ्यांची संयुक्त समिती नेमणार असून आवश्यकता भासल्यास राज्य सरकार मदत करणार आहे. मात्र, अन्न व औषध प्रशासनाकडून घेण्यात आलेल्या निर्णयाला एक वर्षाची स्थगिती देण्यात आली असून खाद्यतेल विक्री करणाऱ्यांना तात्पुरती १ वर्षाची सूट देण्यात येत असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी म्हटलं. मात्र, यानंतर मुदतवाढ नाही, कायदा पाळावाच लागेल, या १ वर्षात प्रत्येकाने आपल्या व्यवसायात अनुकूल बदल करावा, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी केल्या आहेत.

देशात कुठेही सुटे तेल विक्रीला बंदी नाही – ठक्कर

मुख्यमंत्र्यांसोबत मधला मार्ग काढण्यासाठी चर्चा झाली, बंदी उठवावी अशी मागणी आम्ही केली होती. त्यानुसार, मुख्यमंत्री यांनी एका वर्षाची सूट दिली आहे, एक कमिटी यासंदर्भात बनवणार आहेत, त्यात व्यापारी प्रतिनिधी आणि अधिकारी असणार आहेत, अशी माहिती खाद्य तेल महासंघाचे अध्यक्ष शंकर ठक्कर यांनी बैठकीनंतर बोलताना दिली. करोनानंतर लाकडी घाणे सुरु झाले आहेत, काहींनी कर्ज घेत व्यवसाय सुरु केला आहे. मात्र, सुट्या तेलात भेसळ होते असा संभ्रम लोकांचा आहे. १९६० चा कायदा आहे, त्यात पाणी, जमिनीत बदल झाला, व्यापारी त्यात भेसळ करत नाहीत. देशात कुठेही सुटे तेलासंदर्भात बंदी नाही, आपल्याकडे प्रयोग म्हणून हा निर्णय घेतला जातोय. महिलांचा मोठा सहभाग यात झाला आहे, अशात, छोटे, मध्यम आणि महिला विक्रेत्यांना अडचणींचा सामना करावा लागू शकतो. एका वर्षात कमिटी काय तो निर्णय घेईल, त्यात व्यापारी पण असतील आणि बाकी घटक पक्षांचा देखील समावेश असेल, असेही शंकर ठक्कर यांनी म्हटले.

गणेशोत्सवापूर्वीच नव्या...

संख्या कमी असल्यास उमेदवारांना ५ सप्टेंबरपूर्वी नियुक्त करण्याबाबत नमूद करण्यात आले आहे.

शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी याबाबत राज्यातील महापालिका आयुक्त, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, नगरपालिका, नगर परिषदांचे मुख्याधिकारी, खासगी शैक्षणिक संस्थांचे अध्यक्ष, सचिव यांना परिपत्रकाद्वारे सूचना दिल्या आहेत. राज्यातील जिल्हा परिषद, महापालिका, नगरपालिका, नगर परिषद, आदिवासी विकास विभाग शासकीय शाळा, शासकीय विद्यानिकेतन, खासगी शैक्षणिक संस्थांमध्ये पवित्र संकेतस्थळाद्वारे १३ हजार ११९ उमेदवारांची मुलाखतीशिवाय निवड पद्धतीने शिफारस करण्यात आली आहे. त्यात इयत्ता पहिली ते पाचवीच्या वर्गांसाठी ७,५४१, सहावी ते आठवीच्या वर्गांसाठी ४,२०७, नववी ते दहावी या वर्गांसाठी १,११९, अकरावी ते बारावी या वर्गांसाठी २५२ उमेदवारांची शिफारस करण्यात आली आहे. आता या उमेदवारांना रुजू करून नियुक्त केले जाणार आहे.

उमेदवारांना नियुक्ती देण्यापूर्वी उमेदवारांनी स्व-प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेल्या माहितीची, आवश्यक पात्रतेच्या कागदपत्रांची काटेकोरपणे पडताळणी करावी, उमेदवारांनी स्व-प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेली माहिती आणि त्या अनुषंगाने सादर केलेली कागदपत्रे, प्रमाणपत्रे मूळ प्रमाणपत्रांशी विसंगत आढळल्यास कोणत्याही परिस्थितीत उमेदवारास नियुक्तीसाठी पात्र ठरविता येणार नाही. समांतर आरक्षणाचा (महिला आरक्षण वगळून) दावा केलेल्या उमेदवारांबाबतीत कागदपत्र पडताळणीमध्ये पात्र ठरल्यानंतर प्रत्यक्ष नियुक्ती आदेश देण्यापूर्वी उमेदवारांनी केलेल्या दाव्याची पडताळणी मूळ प्रमाणपत्रांवरून सक्षम प्राधिकारी यांच्याकडून करण्यात यावी. पडताळणीनंतर पात्र ठरलेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्याबाबतची कार्यवाही करावी, जिल्हा परिषदेमध्ये शिक्षण सेवक पदावर नव्याने नियुक्ती झालेल्या उमेदवारांस जिल्हा बदलीचा हक्क असणार नाही, असे नियुक्ती आदेशामध्ये नमूद करावे. उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांबाबत शंका, संशय असल्यास त्याबाबतची खातरजमा संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांनी तात्काळ करावी, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

राहुरी-शनिशिंगणापूर...

क्षेत्राचा सविस्तर तपशील दिला आहे. भूसंपादन प्रस्तावित राजपत्रातील अनुसूचीनुसार देसवंडी गावातील विविध गट क्रमांकांच्या शेतजमिनी रेल्वे प्रकल्पासाठी संपादनाच्या प्रक्रियेत आहेत.